


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | रविवार ६ सप्टेंबर २०२४ | अंक ३०१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# ५० % पर्यंतचे आरक्षण आरक्षण वरून शरद पवार याच मोठ वक्तव्य

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी आरक्षणाच्या मुद्यावरून महत्वाचं वक्तव्य केलं आहे. ‘ आरक्षणाची मर्यादा वाढवण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घ्यावा. आरक्षणाची मर्यादा 50 टक्क्यांवरून 75 टक्क्यांवर न्या’ असं शरद पवार म्हणाले. ‘ केंद्राने मर्यादा वाढवण्याचा निर्णय घेतल्यास आमचा पाठिंबा असेल’असंही त्यांनी स्पष्ट केलं. विधेयक आणल्यास आम्हीही केंद्राला पाठिंबा देऊ, असं शरद पवार म्हणाले. आरक्षणाच्या बाबतीत असे आहे की 50 टक्क्यांच्यावर जाता येत नाही. 50 ट्क्क्यांच्या वर आरक्षण जर हवं असेल तर संसदेत कायदेशीर दुरूस्ती केली पाहिजे. काय हरकत आहे दुरुस्ती करायला? आत्ता 50 टक्के आरक्षण आहे ते 75 टक्क्यांपर्यंत जाऊ दे. महाराष्ट्रात 75 टक्के का होऊ शकत नाही? म्हणजे आता 50 % आहे, 75% होण्यासाठी 25 ने वाढवावं लागेल. 25 % वाढवले की ज्यांना मिळालं नाही त्यांचा विचार करता येईल, जिथं कमी आहे त्यांच्याबद्दलही विचार करता येईल.यामध्ये केंद्र सरकारने पुढाकार घ्यावा , संसदेत विधेयक आणावं. आम्ही त्यांना साथ देऊ, असं शरद पवार म्हणाले. मराठा



आरक्षणासोबतच अन्य जे समाज आरक्षणाची मागणी करत आहेत त्यांनाही आरक्षण मिळावे आणि ते देखील कुणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता, अशी आपली भूमिका असल्याचं त्यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केलं.

## मराठा आरक्षण मिळावे ही लोकांची भावना

‘आरक्षण मिळावं अशा प्रकारची भावना लोकांच्या मनात आहे. ते चुकीचे नाही. मात्र हे करत असताना इतरांना जे मिळतं त्याचंही रक्षण करणं, त्याला धक्का न बसणं याबद्दलही काळजी घेणं गरजेच आहे’, असं मत शरद पवार पत्रकार परिषदेत आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना मांडलं.

## प्रकाश आंबेडकरांना टोला

यावेळी शरद पवार यांनी प्रकाश आंबेडकर यांच्यावरही टीका केली. लोकसभा निवडणुकीत ज्यांना एकसुद्धा जागा मिळाली नाही ते लोक माझ्यावर बोलतात. त्यांचं भाष्य प्रसिद्धीसाठी असतं असं म्हणत शरद पवारांनी आंबेडकरांना टोला लगावला.

# संत बाळूमामा जन्मोत्सवानिमित्त पिठ्ठी येथे भव्य कीर्तन महोत्सव

## मामाच्या पालखी क्र ९ चे आगमन

दैनिक लोकआरंभ//

पाटोदा प्रतिनिधी : - श्री संत सद्गुरू बाळुमामा यांचा जन्मोत्सव बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी येथे भव्य उत्साहात साजरा होणार आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भव्य कीर्तन महोत्सव चे आयोजन केले गेले आहे. जगाचा मालक श्री संत



सद्गुरू बाळुमामा यांचा महिमा पूर्ण देशात आपणास पहावयास मिळत आहे. त्यांच्या अनेक पालख्या विविध भागात फिरत असतात त्यांची मेंढरं सांभाळण्यासाठी दूर दूर वरून अनेक भाविक भक्त येत असतात.सेवा करतात. जगाच्या मालकाचा उघडा पसारा जेथे जाईल तिथे मामाचा दरबार भरतोच. विठ्ठल विठ्ठल म्हणा वेळोवेळा! हा सुख सोहळा स्वर्गी नाही ! यावर्षी पिठ्ठी वासियांचे भाग्य असे की, जन्मोत्सवाच्या तोंडावर संत सद्गुरु बाळूमामा देवालय आदमापूर पालखी क्रं - 9 चे आगमन दोन दिवसापूर्वी नगरीमध्ये झाले आहे.भव्य कीर्तन महोत्सवाची सुरुवात 09 ऑक्टोंबर ला होऊन येत्या 15 ऑक्टोंबर ला मामाचा जन्मोत्सव साजरा होणार आहे. त्यामुळे पंचक्रोशीतील समस्त ग्रामस्थ भाविक भक्तांनी मामाच्या दरबारी येऊन कार्यक्रमाचा लाभ घ्यावा...





दै. महाभारत चे माजलगाव तालुका प्रतिनिधी अमर साळवे यांचा वाढदिवस साजरा करतांना माजलगाव मतदार संघाचे भाजपा नेते रमेशरावजी आडसकर , बबन आण्णा सिरसट , आनंत जगताप , जयपाल भिसे , छबन घाडगे सह पत्रकार परमेश्वर सोळंके , बाळासाहेब आडगळे

# तरुणांना रोजगार मिळवून देणारे अभ्यासक्रम आणण्यासाठी आग्रही -डॉ.योगेश क्षीरसागर

## नाळवंडी येथे भाऊसाहेब डावकर यांच्या पुढाकारातून ४० शाळांना संगणक वाटप

बीड (प्रतिनिधी) दि.५ : देशभरात नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होत आहे. स्पर्धेच्या युगात आपल्या विद्यार्थ्यांना टिकायचे असेल तर दर्जेदार शिक्षण देणे काळाची गरज बनली असून ती आपली जबाबदारी आहे. आपल्या शिक्षण संस्थांमध्ये तरुणांना रोजगार मिळवून देणारे विविध अभ्यासक्रम आणण्यासाठी आपण कायम आग्रही असतो, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले आहे. बीड तालुक्यातील नाळवंडी येथील निवासी आश्रमशाळेत शुक्रवारी (दि.५) जिल्हा परिषद गटातील ४० शाळांना संगणक संच वाटपाचा कार्यक्रम झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.योगेश



क्षीरसागर हे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच ॲड.राजेंद्र राऊत हे होते. व्यासपीठावर अरुण लांडे, सुधीर काकडे, पंचायत समितीचे माजी सदस्य अच्युतराव शेळके, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, युवा नेते अशोक वाघमारे, माजी नगरसेवक रमेश चव्हाण, सुनिल सुरवसे, विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, माजेद कुरेशी, सरपंच भारत कानडे, सरपंच रवी गंगावणे, सरपंच तेजाब चव्हाण, अशोक वैद्य, बाबासाहेब शिंदे, शाम राऊत, बाळासाहेब डोळस, संजय काळे, बाळराजे राठोड, भगीरथ बांडे, मिलिंद ठोकळ, अभिमान गुंदेकर, प्रा.अमोल घुमरे, बाळू आमटे आदींची उपस्थिती होती. डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, माझे सहकारी भाऊसाहेब डावकर यांच्या पुढाकारातून सामाजिक बांधिलकी म्हणून खाजगी कंपनीच्या सामाजिक दायित्व निधीतून ४० संगणक संच जिल्हा परिषद शाळांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना शाळेतच तांत्रिक शिक्षण मिळेल. त्यातून विद्यार्थी अभ्यासू होतील. बीड विधानसभा मतदारसंघात स्व. केशरकाकू क्षीरसागर यांनी शिक्षण संस्थांच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा आणली. या क्षेत्रात अलीकडे अमुलाग्र बदल झाले आहेत. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि रोजगार मिळवून देणारे शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी आपण कायम आग्रही असतो, असेही डॉ.क्षीरसागर म्हणाले. यावेळी भाऊसाहेब डावकर यांचा सत्कार करून मान्यवरांनी नाळवंडी जिल्हा परिषद गटातील ४० शाळांना संगणक संच वितरित केले. यावेळी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# भाग्यवंत कुटुंबांना दिवाळीपूर्वी मिळणार ७000 रुपये !

**दैनिक लोकआरंभ//**
विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने वेगवेगळ्या निर्णयांचा धडाका लावला आहे. जनतेच लक्ष आकर्षित करण्यासाठी सरकारकडून अनेक लोकप्रिय घोषणा केल्या जात आहेत. दरम्यान, राज्यातील अनेक शेतकरी आणि महिलांना वेगवेगळ्या योजनेअंतर्गत आर्थिक लाभ दिला जातोय. म्हणूनच राज्यातील काही भागव्यंत कुंटुंबाना दिवाळीपूर्वी एकूण 7000 रुपये मिळू शकतात. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र महिलांच्या बँक खात्यात एकूण 3000 रुपये पाठवले जात आहेत. राज्य सरकारने ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्याचे पैसे ऑक्टोबर महिन्यातच देण्याचा निर्णय घेतला आहे. याच निर्णयाअंतर्गत पात्र महिलांना 3000 रुपये दिले जात आहेत. केंद्र सरकारच्या पीएम शेतकरी सन्मान निधी योजनेच्या 18 हत्याच्या वितरणास सुरुवात झाली आहे. या वितरणाची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आली.




नरेंद्र मोदी 5 ऑक्टोबर रोजी वाशिमच्या दौऱ्यावर होते. त्यावेळी एका कार्यक्रमात मोदींनी या वितरणाचा शुभारंभ केला. या योजनेअंतर्गत 18 व्या हप्त्याच्या रुपात पात्र शेतकऱ्यांना 2000 रुपये मिळणार आहेत. पीएम शेतकरी सन्मान योजनेच्या धर्तीवर राज्य सरकारने नमो शेतकरी महासन्मान योजनेला सुरुवात केलेली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना वर्षाला 6000 रुपये दिले जातात. तीन टप्प्यांत ही रक्कम वितरित करण्यात येते. या योजनेच्या पाचव्या हत्याचे वितरण करण्यास सुरुवात झाली आहे. या पाचव्या हप्त्यात शेतकऱ्यांना 2000 रुपये मिळणार आहेत. भागव्यंत कुटंबांना मिळणार 7000 रुपये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योनजेचे 3000 रुपये, नमो शेतकरी महासन्मान योजनेचे 2000 रुपये, पीएम शेतकरी सन्मान योजनेचे 2000 रुपये असे एकूण सात हजार रुपये काही कुटुंबांना मिळू शकतात. अर्थात त्यासाठी या तिन्ही योजनांचे लाभार्थी एका कुटुंबात असणे गरजेचे आहे. एखाद्या शेतकरी कुटुंबातील एका महिलेला लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळत असेल तसेच पीएम शेतकरी सन्मान योजना आणि नमो शेतकरी महासन्मान योजनेचाही लाभ मिळत असतील तर अशा कुटुंबांना दिवाळीच्या अगोदरच एकूण 7000 रुपये मिळतील.

# बीडच्या बालरंगभूमी परिषदेने दिव्यांगांच्या चेहर्‍यावर हास्य फुलवण्याचे काम केले

## निलम शिर्के सामंत यांचे प्रतिपादन; बीडमध्ये यहाँ के हम सिकंदर दिव्यांग महोत्सवाचे उद्घाटन

### दिव्यांग मुलांची समाजाशी नाळ जोडणे हा महोत्सवाचा उद्देश-डॉ.दिपाताई क्षीरसागर

डॉ.दिपाताई क्षीरसागर म्हणाल्या की, दिव्यांग बालकांसाठी अ‍ॅड.निलम शिर्के सामंत यांचे मोठे कार्य आहे. दिव्यांग बालकांच्या चेहर्‍यावर हास्य फुलविण्याचे लाख मोलाचे कार्य त्यांच्या हातून होत आहे. परिषदेचा लोककला महोत्सव असो की दिव्यांग महोत्सव असा प्रत्येक उपक्रम राज्यात सर्वप्रथम बीडमधून राबविण्याची परंपरा यापुढे ही कायम ठेवू असे त्यांनी सांगितले.

### आकाशात फुगे सोडून लुटला आनंद; मुलांनी तयार केलेल्या वस्तूचे प्रदर्शन

कार्यक्रमापूर्वी प्रांगणावर दिव्यांग मुलांच्या हस्ते फुगे आकाशात सोडून आनंद लुटला. बीड जिल्ह्यातील २३ शाळेतील २६१ दिव्यांग कलाकारांसह शिक्षकांचा सहभाग होता. यावेळी सांस्कृतिक नृत्य, एकांकिका, नाट्य, विविध गीते सादर करत आपली कला सादर केली. या दिव्यांग महोत्सवाचा दिव्यांग मुलांनी कार्यक्रमाचा आनंद लुटला. तसेच, दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन भरवले होते. या प्रदर्शनाला निलम शिर्के सामंत यांनी भेट देऊन त्यांचे कौतुक केले. प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी वस्तूंची खरेदी केली. यामुळे दिव्यांग मुलांच्या चेहर्‍यावर आनंद पहावयास मिळाला.

बीड (प्रतिनिधी)दि.५ : दिव्यांग मुलांच्या चेहर्‍यावरील आनंद पाहण्यात वेगळेच समाधान असते. ही मुले निरागस असून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचे काम बालरंगभूमी परिषदेने केले आहे, असे प्रतिपादन बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष निलम शिर्के सामंत यांनी केले. बीडमध्ये बालरंगभूमी परिषद आयोजित 'यहाँ के हम सिकंदर' दिव्यांग महोत्सव शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयात शनिवारी (दि.५) उत्साहात झाला. मान्यवरांच्या हस्ते नटराज पूजन करण्यात आले. यावेळी उद्घाटक म्हणून निलम शिर्के सामंत ह्या बोलत होत्या. व्यासपीठावर स्वागताध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्ष डॉ.दिपाताई




क्षीरसागर, संस्कार भारतीच्या देवगिरी प्रांताध्यक्ष स्नेहल पाठक, सावरकर महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रिती पोहेकर, महोत्सव समितीच्या सदस्य दिपाली शेळके, बालरंगभूमी परिषदेचे प्रमुख कार्यवाह संजय पाटील देवळाणकर, अनुराधा चिंचोलकर, शाहीर विलास सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. निलम शिर्के सामंत म्हणाल्या की, राज्यात दिव्यांग महोत्सवाची सुरूवात सर्व प्रथम बीड शाखेच्या अध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून होत आहे. महोत्सवाचे हे पहिले वर्ष असून पुढील वर्षी यापेक्षा आणखी उत्तम नियोजन केले जाईल. दिव्यांग मुलांच्या पालनपोषणात आईनंतर शिक्षकाचा मोलाचा वाटा असतो. त्यामुळे दिव्यांग शिक्षकांनी पुढे येऊन बालरंगभूमी परिषदेला सूचना कराव्यात. सूचना विचारात घेऊन आणखी मोठा दिव्यांग महोत्सव आयोजित केला जाईल, असेही त्या म्हणाल्या. स्वागताध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, महोत्सवातून दिव्यांग मुलांच्या कलागुणांना वाव मिळणार आहे. दिव्यांग बालकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दिव्यांग महोत्सव हा स्तुत्य उपक्रम आहे, असे ते म्हणाले. प्रास्ताविक डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केले. सुत्रसंचलन डॉ.संजय पाटील देवळाककर यांनी केले. आभार स्नेहल पालक यांनी मानले.

# बीड़ शहर बचाव मंचाने बैठकीत गाभीर्याने लक्षवेधी प्रश्न मांडले

बीड । प्रतिनिधी बीड शहर बचाव मंचाच्या वतीने पोलीस अधीक्षक यांना बैठकीची मागणी करण्यात आली होती. या बैठकीमध्ये बीड शहर बचाव मंचाच्या समन्वय समिती मंडळाच्या वतीने बीड शहरातील काही प्रश्न गांभीर्याने मांडण्यात आले. हे प्रश्न पोलीस प्रशासनाच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहेत त्यापेक्षा हे बीड शहरातील सर्वच भागातील नागरिकांसाठी अति महत्त्वाचे आहेत हे आम्ही त्यांच्या लक्षात आणून दिले. या बैठकीच्या अनुषंगाने बीड शहरातील सर्व भागातील नागरिकांच्या वतीने बीड शहर बचाव मंचाने निवेदन दिले त्यात खालील मागण्या नमूद केलेल्या आहेत.

शहरातील रहदारी सुरळीत व्हावी, यासाठी तात्काळ उपाययोजनात करण्यात याव्यात. शासकीय रुग्णालये, शासकीय कार्यालये मुख्य बाजारपेठां तील रस्ते इत्यादी ठिकाणी पार्किंगची व्यवस्था तात्काळ करण्यात यावी. आवश्यक तिथे सगळीकडेच सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत . उदा. अंबिका चौक ते रिलायन्स पेट्रोल पंप रोडवर या भागात काही ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत. रस्त्यावरील मोकाट जनावरे कुत्रे अनाधिकृत बॅनर्स फ्लेक्स रहदारीला अडथळा निर्माण करणाऱ्या सर्व बाबी हटवण्यासाठी नगरपालिकेला पत्र देण्यात यावे. शहेनशावली दर्गा बलभीम चौक बार्शी नाका व आवश्यक त्या सर्व ठिकाणी पोलीस चौकी स्थापित करणे व बंद पडलेल्या पोलीस चौकांमध्ये कर्मचारी कार्यान्वित करण्यात यावेत. अवैध धंदे वाढत चाललेली अमली पदार्थांची तस्करी व व्यसनाधीनता इत्यादी बाबत कठोर उपाययोजना करण्यात याव्यात. शाळा, कॉलेजेस, कोचिंग क्लासेस इत्यादी ठिकाणी चिडीमार पथक यांची नियमित फेऱ्या चालू ठेवाव्यात.बंद झालेल्या बँकांच्या वर कठोर कारवाई करण्यात यावी.

बंद झालेल्या बँकांच्या वर कठोर कारवाई करण्यात यावी, संचालक मंडळांची चौकशी करण्यात यावी. या बैठकीचे निवेदन देताना, बीड शहर बचाव मंच समन्वय समितीच्या शिष्ट मंडळामध्ये निमंत्रक नितीन जायभाये, अध्यक्ष कॉम्रेड भाऊ प्रभाळे, सेक्रेटरी अशोक येडे, प्रमुख मार्गदर्शक डी.जी. तांदळे उपाध्यक्ष परवेज भाई कुरेशी उपाध्यक्ष फय्याज भाई इक्बाल सय्यद मंचाचे प्रमुख कायदेशीर सल्लागार अ‍ॅड. अनिल बारगजे अ‍ॅड. नितीन वाघमारे सहसचिव सादेकभाई सय्यद, मार्गदर्शक शेख हाफिज मोईनुद्दीन शहर काझी, किस्किंदा पांचाळ सोबत आदी सदस्यांची उपस्थिती होती.

# आमदार राजेश पवार यांच्या वतीने पाटोदा थडी येथील भाविकांना काशी विश्वनाथ दर्शन



नायगाव ।हनुमंत चंदनकर ८९ नायगाव विधानसभा मतदारसंघातील आमदार राजेश पवार यांच्यावतीने आज दिनांक ४ ऑक्टोबर रोजी पाटोदा थडी येथील ४० भाविकांना काशी विश्वनाथाच्या दर्शनासाठी तीर्थयात्रा दर्शनासाठी भाविकांना रवाना केले आमदार पवार यांनी आपल्या मतदारसंघातील नागरिकांना तीर्थ दर्शन घडावे यासाठी अनेक तीर्थयात्रेचे आयोजन सुरू केले आहे जेजुरी येथील खंडोबाचे दर्शन यात्रा शिक्षक कपिलधार मन्मथ स्वामी दर्शन उज्जैन येथील महाकालेश्वर दर्शन अजमेर दर्शन यासह अनेक ठिकाणी तीर्थ दर्शनाला घेऊन जात आहेत पाटोदा येतील ग्रामदैवत हनुमंत रायाचे दर्शन घेऊन भाविक बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग काशी विश्वनाथाच्या दर्शनाला रवाना झाले यात महिला भक्त पुरुष भक्त हर हर महादेव जय श्रीराम च्या घोषणा देत काशी विश्वनाथ दर्शनासाठी रवाना झाले

# गोल्डन चॉईस हॉटेलच्या मॅनेजरवर पोस्कोचा गुन्हा दाखल

## मॅनेजरसह पीडीतेशी अश्लील चाळे करणारा तरुण गजाआड

बीड दि.५(प्रतिनिधी) शहरातील बार्शी रोडवरील हॉटेल गोल्डन चॉईसमध्ये दोन जोडप्यांच्या कारणावरून तुफान राडा झाल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणात काल १५० ते २०० जमावावर गुन्हा दाखल केला. त्यानंतर याच प्रकरणात रात्री उशिरा पोलिसांनी स्वत:हून फिर्याद देत हॉटेल गोल्डन चॉईसचे मॅनेजर व पीडीतेशी आश्लाल चाळे करणाऱ्या तरुणाविरुद्ध पोस्को अंतर्गत शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दोघांनाही अटक केली बीड शहरातील हॉटेल गोल्डन चॉईसमध्ये शेख शहेबाज शेख जियाओदिन (वय२०रा. इस्लामपुरा, बीड) याने एका अल्पवयीन पीडित मुलीला गोल्डन चॉईस हॉटेलमधील एका रूम मध्ये नेऊन तिचा विनयभंग केला. तर हॉटेल मॅनेजर अभिषेक शंकर धनवडे यांने त्यास गोल्डन चॉईस हॉटेलमध्ये रूम देऊन सहकार्य केले अशी फिर्यादी शहर ठाण्याचे पोउपनि शेख यांनी दिली. यावरून शेख शहेबाज शेख जियाओदिन, मॅनेजर अभिषेक शंकर धनवडे (वय२३रा.जिंतुर) यांच्याविरुद्ध कलम ७४,७५,४९,५४ भारतीय न्याय संहिता, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२च्या कलम ८,१२,१७ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. चॉईस मधून दोन जोडप्यांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांना घेऊन जात असताना त्या ठिकाणी उपस्थित जमावाने त्या जोडप्यांना मारहाण करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये पोलिसांना धक्काबुक्की केली. या प्रकरणात पोलिसांनी १५० ते २०० लोकांच्या जमावर गंभीर स्वरूपांचे गुन्हा दाखल केले आहेत. त्यापैकी सहा जण निष्पन्न झाले असून आज पुन्हा त्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी पोलिसांकडून सुरू ठेवण्यात आली आहे. त्यामुळे जेव्हा असतील आणखी काही नावे निष्पन्न होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



# पत्रकार परिषदेच्या मागणीला यश ;अखेर राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला सुरुवात

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : राष्ट्रीय महामार्ग 161-A च्या रुंदीकरणासाठी कामास जवळपास ६ वर्ष पूर्ण होत आली तरीही शहरातील काही तक्रारीमुळे कामास सुरुवात न झाल्यामुळे शहरांमधून रस्त्याने खड्डे धुळीचे साम्राज्य यामुळे व्यापाऱ्यासह नागरिक त्रस्त झाली होती याबाबत वारंवार निवेदने देऊनही कामात सुरुवात न झाल्यामुळे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने व्यापारी व सुजान नागरिकांना सोबत घेऊन आहे त्या रस्त्याचे डांबरीकरण किंवा सीसी रस्ता हा तात्काळ सुरू करावा जेव्हा न्यायालयाचा निकाल लागेल तेव्हा निकालानुसार कामात सुरुवात करावी तोपर्यंत खड्डे व धुळीच्या साम्राज्यातून नागरिकांना व व्यापाऱ्यांना मुक्त करावे यासाठी पत्रकार संघाने आंदोलन ७- जुन २०२४ केले होते .राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांच्या आश्वासनाने आंदोलन मागे घेतले व त्यांच्या म्हणण्यानुसार वेळाने का होईना ४-आक्टोबर रोजी कामास सुरुवात झाल्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण होत आहे .

भोकर फाटा ते धानोडा पर्यंत राष्ट्रीय महामार्ग 161 A रुंदीकरणाचे कामास सुरुवात होऊन किमान अंदाजे ६ वर्ष पूर्ण झाली इतर सर्वीकडील कामे कसेही का होईना पूर्ततास झाली . यातच नागरिकांमध्ये थोडेही का होईना समाधान मानले जात आहे . मुख्य शहरातुन जाणारा राष्ट्रीय महामार्ग



यांचे काम काही तक्रारीमुळे थांबले होते तसेच गोकुंदा येथील उड्डान पुल याचेही काम थांबल्यामुळे दोन्हीही जागी खड्डे व धुरड्याचे साम्राज्य जमले यामध्ये राष्ट्रीय महामार्गाने वाहतूक अधिक प्रमाणात वाढल्यामुळे शहरांमधल्या व्यापारी व नागरिकांना वाहनाने उडणाऱ्या धुळीचे व रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यामुळे वाहनधारकांना वाहन चालवण्याचे त्रास अधिक होत होता .यामध्ये अनेक अपघातही घडले . राष्ट्रीय महामार्ग हा १०० फुटाचा व्हावा या रास्त मागणीसाठी अनेक विकास प्रेमींनी मागण्याही केल्या त्या मागण्या मध्ये सत्य असून काही मालमत्ताधारकांच्या मावेजा मागण्यानुसार कोर्टात मालमत्ताधारकांनी तक्रार नोंदवली निकालापर्यंत सदरील काम थांबले होते . मागील सहा वर्षापासून रस्त्यातील खड्ड्यामुळे व धुळीमुळे व्यापाऱ्यांसह नागरिक त्रस्त झाली सदरील कामास सुरुवात व्हावी .याबाबत सर्व वृत्तपत्र प्रतिनिधी बातम्याही प्रकाशित केल्या परंतु प्रशासन व संबंधित गुत्तेदार यावर कोणताही असर पडला नसल्यामुळे ७-जून रोजी पत्रकार संघाने शहरातील रस्ता न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत आहे त्या स्थितीमध्ये सध्याचा डांबरीकरण करून देण्यात यावा न्यायालय निकालानंतर मंजुरी रस्ता रुंदीकरणाचे कार्य सुरू व्हावे तसेच गोकुंदा येथील रेल्वे पटरी जवळ उडान ब्रिज मंजूर असूनही येथे तांत्रिक अडचणीमुळे त्याही कामात स्थगिती आली होती या दोन्ही स्थगिती पाहता पत्रकार संघाने दिनांक ७- जून रोजी 161 A राष्ट्रीय महामार्गाच्या शहरातून जाणाऱ्या रस्त्यावर डांबरीकरण किंवा सीसी रस्ता करण्याकरता मागणीचे ७- जुन रोजी जिजामाता चौक येथे विकास प्रेमी नागरिक व व्यापाऱ्यांना सोबत घेवून आंदोलन छेडले होते .या आंदोलनाची राष्ट्रीय महामार्ग संबंधित अधिकारी व संबंधित गुत्तेदार यांनी दखल घेत आज दिनांक ४-ऑक्टोबर रोजी रस्ता बनवण्यासाठी खोदकाम सुरू केले असून शहरातील धुळीच्या त्रासापासून नागरिकांना व व्यापाऱ्यांना सुटका होणार यामध्येच शहरवासीयांमध्ये समाधान मानल्या जात आहे .

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार ६ सप्टेंबर २०२४
https://lokaarambh.com



# वडवणीत रेणुका मातेच्या दर्शनासाठी भाविकांचा ओघ

## बुधवारी मातेची पालखी मिरवणूक तर शनिवारी रावण दहन




वडवणी,प्रतिनिधी, अंकुश गवळी वडवणी परिसराच्या पंचक्रोशीत नवसाला पावणारी माता म्हणून प्रसिध्द असणाऱ्या वडवणी शहरातील भाविक-भक्तांची आराध्यदैवता श्री. रेणुकामाता संस्थान याठिकाणी यंदाही मोठ्या जल्लोषात व हर्षोल्हासात नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. गुरुवार रोजी घटस्थापनेने या नवरात्रोत्सवास सुरुवात झाली आहे. तसेच बुधवार रोजी सातव्या माळेच्या दिवशी मातेची पालखी मिरवणूक मंदिर ते संपूर्ण गाव अशी हलकीच्या व टाळमृदंगाच्या गजरात संपन्न होणार असून शनिवारी विजयादशमी दिनी सायंकाळी ठीक ७ वाजता मंदिर परिसरात रावण दहनाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी याप्रसंगी वडवणी पंचक्रोशीतील सर्व भाविक-भक्तांनी व जनतेने उपस्थित राहून या दैदिप्यमान कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन श्री.रेणुकामाता संस्थानाचे संस्थानप्रमुख अण्णा महाराज दुटाळ यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मागील वर्षभरापासून वडवणी पंचक्रोशीतील संपूर्ण भाविक भक्तांना ज्या क्षणाची आतुरतेने ओढ होती प्रतिक्षा होती तो क्षण म्हणजे तमाम वडवणीकरांची अराध्यदैवता श्री.रेणुका मातेच्या मनोभावे दर्शनाची. यावर्षीचा नवरात्र महोत्सव दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ गुरुवार रोजी घटस्थापनेपासून सुरु झालेला आहे. या संपूर्ण नवरात्रीमध्ये श्री.रेणुकामाता संस्थान यांच्याकडून मातेची विधिवत पूजाअर्चा व जागर करण्यात येणार असून दैनंदिन देवीचा जागरही करण्यात येत आहे. दरम्यान वडवणी परिसराच्या पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांच्या श्रध्दास्थान असलेल्या तसेच भाविकांच्या नवसाला पावणारी आई म्हणून प्रसिध्द असणाऱ्या वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्यदैवता शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या श्री.रेणुकामाता संस्थान या ठिकाणी मातेच्या मनोभावे दर्शनासाठी सध्या नवरात्र महोत्सवादरम्यान भाविक उदंड अशी उपस्थिती दर्शवत आहेत. पहिली माळ गुरुवार रोजीपासूनच वडवणी सह परिसरातील भाविकांनी उपस्थित राहून रेणुकामातेचे मनोभावे दर्शन घेतले. दररोजच्या सकाळ व सायंकाळच्या मातेच्या आरतीस देखील भाविकांची उपस्थिती लक्षणीय असते. या नवरात्र महोत्सवाच्या दरम्यान दिनांक ९ ऑक्टोबर २०२४ बुधवार रोजी सातव्या माळेला सायंकाळी ६ वाजता देवीची पालखी मिरवणूक मंदिरापासून ते संपूर्ण गाव अशा स्वरुपात टाळ-मृदंगाच्या, ढोल-ताशांच्या व हलकीच्या गजरात संपन्न होणार आहे. त्याचप्रमाणे दिनांक १२ ऑक्टोबर २०२४ शनिवार रोजी सायंकाळी ठीक ७ वाजता विजयादशमी दसरादिनी मंदिर परिसरातील डोंगरावर भव्य असा ३५ फुट उंचीचा रावण दहनाचा कार्यक्रम देखील मान्यवरांच्या शुभहस्ते व हजारो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. तसेच दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ बुधवार रोजी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त महाप्रसाद दुधाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी याप्रसंगी वरील सर्व कार्यक्रमांस वडवणी पंचक्रोशीतील सर्व भाविक-भक्तांनी व जनतेने उपस्थित राहून या दैदिप्यमान कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन श्री.रेणुकामाता संस्थानाचे संस्थानप्रमुख अण्णा महाराज दुटाळ, राहूल दुटाळ, बाळासाहेब दुटाळ, परशुराम दुटाळ यांनी केले आहे.



महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक तोंडावर येऊन ठेपली आहे. विधानसभा निवडणूक जशी जशी जवळ येत आहे, त्यानुसार राजकीय घडामोडींना वेगाने घडताना दिसत आहेत. यंदाची विधानसभा निवडणूक महायुती विरुद्ध महाविकासआघाडी अशी होणार आहे. या अनुषंगाने विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये जोरदार आरोप प्रत्यारोप होत आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघात नणंद आणि भावजय अशी लढत झाली होती.

## भागूबाई भैरट यांचे निधन



केज । प्रतिनिधी तालुक्यातील उमरी येथील ज्येष्ठ महिला भागूबाई बापूराव भैरट वय ८५ वर्ष यांचे शुक्रवार रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर उमरी येथील मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुली ,एक मुलगा ,जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या प्राचार्य शंकर भैरट यांच्या मातोश्री होत.

## महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीआधी लोकार्पण आणि भूमिपूजनाचा धडाका

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी दोघेही आज महाराष्ट्रात होते. पोहरादेवीतून मोदींच्या निशाण्यावर अधिक वेळ काँग्रेसचं राहिली. तर कोल्हापुरातून संविधान आणि जनगणनेवरुन राहुल गांधींनी मोदी सरकारवर टीकास्त्र सोडलं. एकाच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी महाराष्ट्रात आले. मोदी,पोहरादेवीतून काँग्रेस आणि महाविकास आघाडीवर तुटून पडले तर राहुल गांधींनी कोल्हापुरातून भाजपवर निशाणा साधला.बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरादेवीत मोदींच्या हस्ते नगारा संग्रहालयाचं अनावरण झालं. मोदींनी नगाराही वाजवला. बंजारा समाजाच्या वतीनं परंपरागत नृत्यानं मोदींचं स्वागत झालं. जगदंबा देवीची आरतीही मोदींनी केली तर, राहुल गांधींच्या हस्ते कसबा बावड्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण झालं. मोदी पोहरादेवीत होते, त्यामुळं बंजारा समाजावरुन काँग्रेसवर टीकास्त्र सोडलं. स्वातंत्र्यानंतर बंजारा समाजाला, काँग्रेसनंच मुख्य प्रवाहापासून दूर ठेवल्याचा आरोप केला. तर सरकारी मोठ्या संस्थांमध्ये भाजपकडून संघाच्याच माणसांची भरती होते. दलित, आदिवासी आणि ओबीसी दिसत नाही, असा पलटवार राहुल गांधींनी केला. पोहरादेवीत मोदींच्या हस्ते, पीएम किसान सन्मान निधी योजना आणि नमो शेतकरी महासन्मान निधीचंही वितरण झालं. मात्र मोदींच्या भाषणात अधिक वेळ काँग्रेसच निशाण्यावर राहिली. काँग्रेसला शहरी नक्षली चालवत असल्याचा गंभीर आरोप मोदींनी केला आहे. इकडे उद्धव ठाकरेंनीही मोदी आणि मुख्यमंत्री शिंदेंवर शाब्दिक तोफ डागली. निवडणुकीआधी कितीही फिती कापा, निवडणुकीत भाजप आणि गद्दारांना जागा दाखवणार असा हल्लाबोल ठाकरेंनी केला.

## राज्यात आम्हाला दहा जागा द्याव्यात, रामदास आठवले यांची मागणी

शरद पवार यांनी आरक्षण 75 टक्क्यांपर्यंत नेले पाहीजे अशी मागणी केली आहे. परंतू मनमोहन सिंह यांचे सरकार असताना काही मर्यादा वाढविली असा सवाल केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. शरद पवार चार वेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते त्यावेळी त्यांनी आरक्षण मर्यादा का नाही वाढविली असाही सवाल रामदास आठवले यांनी केला आहे.बीड येथे केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांची रॅली झाली. यावेळी भाषण करताना रामदास आठवले यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. भारत हा 140 कोटींचा देश आहे. लोकसभा निवडणूकांच्या वेळी घटना बदलणार अशी चर्चा काँग्रेसने सुरु केली. मात्र कोणाचा बाप आला तर संविधान बदलता येणार नाही. आमची कळ काढणे एवढी सोपी गोष्ट नाही. आम्ही दलितांवरील अन्याय आणि बाबासाहेबांचा अपमान सहन करणार नाही असेही आठवले यांनी यावेळी सांगितले. मराठे जेव्हा आरक्षण नको म्हणत होते तेव्हा आम्ही मराठ्यांना आरक्षण देण्याची पहीली मागणी केली होती असे रामदास आठवले यांनी यावेळी सांगितले. आज अनेक मराठा नेते पुढाकार घेत आहेत असेही आठवले यावेळी म्हणाले. केंद्रात नरेंद्र मोदी चांगले काम करीत आहेत. मात्र आम्हाला त्यांनी महाराष्ट्रात बळ दिले पाहीजे. मराठा समाजाच्या पाठीमागे आम्ही आहोत. ओबीसी समाजाला देखील आम्हाला न्याय द्यायचा आहे. जरांगे पाटील यांची मागणी योग्य असली तरी ओबीसींवर देखील अन्याय व्हायला नको. मराठा समाजासाठी विनायक मेटे यांनी चांगले काम केले होते. मराठा समाजासाठी सतत कार्यरत असलेला नेता आज आपल्यात नाही. मला मेटे, गोपीनाथ मुंडे आणि महाजन यांची आठवण यावेळी आल्यावाचून राहत नाही असेही रामदास आठवले यावेळी म्हणाले.

## आता विमानासारखी बस धावणार, खासियत काय?

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी एक मोठी घोषणा केली आहे. आता लवकरच रस्त्यावर विमानासारखी बस धावताना दिसणार आहे. विशेष म्हणजे या बसचे तिकटीही फार कमी असणार आहे, अशी घोषणा नितीन गडकरी यांनी केली. ते नागपुरातील वाडी नगर परिषदच्या इमारतीचे लोकार्पण सोहळ्यावेळी बोलत होते.
नितीन गडकरी यांनी नागपुरातील वाडी येथील उड्डाणपुलाचे उद्घाटन केले. त्यानंतर नितीन गडकरींच्या हस्ते नागपूरच्या वाडी नगर



परिषदच्या इमारतीचा लोकार्पण सोहळा पार पडला. यावेळी नितीन गडकरींनी आगामी काळात सुरु होणाऱ्या एका नव्या बसबद्दलची माहिती दिली. या बसची काय खासियत असणार आहे,

## छत्रपती शिवरायांची प्रतिमा स्वीकारताना राहुल गांधींनी केलं असं काही



आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील राजकीय घडामोडी वेगात सुरु आहेत. देशातील अनेक वरिष्ठ नेत्यांकडून सातत्याने महाराष्ट्राचे दौरे सुरु आहेत. त्यातच आज काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांचा कोल्हापूर दौरा पार पडला. यावेळी त्यांनी कसबा बावडा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केली. या सोहळ्याला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, कोल्हापूरचे खासदार श्रीमंत शाहू महाराज छत्रपती, विधान परिषद सदस्य सतेज पाटील यांच्यासह प्रदेश काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनी हजेरी लावली. यावेळी राहुल गांधी यांच्या एका कृतीने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. कोल्हापुरातील कसबा बावडा या ठिकाणी असलेल्या भगवा चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला आहे. आमदार सतेज पाटील यांच्या संकल्पनेतून हा बहुशस्त्रधारी भव्य पुतळा साकारला आहे. या पुतळ्याचे अनावरण काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केले. या अनावरण सोहळ्यानंतर त्यांना या पुतळ्याची एक छोटी प्रतिमा भेट म्हणून देण्यात आली. ही प्रतिमा स्वीकारताना राहुल गांधींनी भर सभेदरम्यान त्यांच्या पायातील बूट बाजूला काढून ठेवले. याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओवर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी प्रतिक्रिया दिली.

## रमाई घरकुल साठी ५ लाख रु अनुदान करावे मंत्री राम दास आठवले यांच्याकडे मागणी-मनोज (नाना)मस्के

बीड । प्रतिनिधी रमाई घरकुल आवास योजना शहरी व ग्रामीण अनुदानात प्रत्येकी ५ लाख रुपये वाढ करण्यात यावी या मागणीचे निवेदन केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांना मनोज उर्फ नाना यांनी निवेदन देऊन केली मागणी.

बऱ्याच वर्षापासुन रमाई घरकुल आवास योजना शहरी व ग्रामीण भागात कार्यरत आहे. लाखो मागासवर्गीय कुटुंबीयांनी याचा लाभ देखील घेतलेला आहे. ज्यानुसार शहरी भागासाठी २,५०,०००/- रक्कम (पैकी



कपात होऊन मिळणारी रक्कम २,३१,२५०/-) मिळत आहे तसेच ग्रामीन भागासाठी १,५०,०००/- रुपये (पैकी कपात होऊन मिळणारी रक्कम १,३२०००/- ) लाभार्थ्यांना मिळत आहे. तरी महागाइई निर्देशांकानुसार सध्या बाजारात लोखंड, सिमेंट, वीट, वाळु,व बांधकामासाठीची मजुरी खूप मोठया प्रमाणात वाढलेली आहे. शहरी भागासाठी अडीच लाख रुपये तर ग्रामीण भागासाठी दीड लाख रुपये दिले जातात ही रक्कम सध्या तुटपुंजी पडत आहे. सर्व वस्तुंचे भाव वाढल्यामुळे रमाई घरकुल आवास योजनेचे स्पप्नातील घर बांधने अशक्य झाले आहे.तरी मा. मंत्री या सर्व गोष्टींचा विचार करुन शहरी व ग्रामीण भागात फरक न करता प्रत्येकी पाच लाख रुपये घरकुल अनुदन निधी वाढ करावी अशी मागणी या निवेदनातून करण्यात येत आहे. निश्चितपणे वाढ झाली तर अनेकांची स्वप्नातील घरकुल बांधण्याची स्वप्नपुर्ती होऊ शकते. तरी या मागणीच्या निवेदनाचा याचा सहानुभुतीपुर्वक विचार करावा व निर्णय घ्यावा.अशी मागणी करण्यात आली आहे.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या ईच्छूक उमेदवारांच्या मुलाखती संपन्न

## पवार निष्ठावंतांना न्याय देणार की फितूरांना पायघड्या घालणार ? जनतेच्या मनातील प्रश्न

माजलगाव/धारूर/वडवणी ( प्रतिनिधी )महाराष्ट्र विधान सभा निवडणूकीचे स्वयंवर जवळ येऊन ठेपले आहे. सर्वच पक्ष वर चाचपणी करत आहेत.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पक्षाच्या वतीने निसर्ग मंगल कार्यालय,मार्केट यार्ड पुणे येथे खा.शरदचंद्र पवार यांचे सह पक्षाचे पार्लमेंट्री बोर्ड दि.५ ते ७ ऑक्टोबर २०२४ दरम्यान सर्व ईच्छूक उमेदवारींच्या मुलाखती घेत आहे.

माजलगाव मतदार संघासाठी एकूण १० उमेदवारांनी पक्षाची सभासद नोंदणी शुल्क,राष्ट्रवादी मासिकाची वार्षिक वर्गणी व नाम मात्र पक्ष निधी रक्कम भरून आपले पक्ष कार्याच्या अहवालासह उमेदवारी ईच्छूक अर्ज सादर केलेले होते.

पक्षाच्या कार्यपध्दतीनूसार माजलगाव मतदार संघासाठी ईच्छूक उमेदवार म्हणून माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील , प्रा.ईश्वर मुंडे,नारायण डक,सौ. ज्योतीताई डक,प्रा.श्रीहरी काळे,मनोहर डाके,गंगाभिषन थावरे,मंजूर शेख यांचेसह मोहन जगताप यांनी मुलाखती दिल्या आहे.

माजलगाव मतदार संघात ईतर पक्षातील उमेदवार आपल्या समर्थकांचे मेळावे घेऊन आपली किती हजारी मनसबदारी आहे ते दाखवून देत आहेत.

माजलगाव मतदार संघात



महा विकास आघाडीला अच्छे दिन येतील असे वातावरण दिसत आहे.

या मुळे पक्ष बाहेरील ईच्छूक शरद पवारांना कोण भेटले,जयंत पाटील यांना कोण भेटले याच्या दररोज वेग वेगळ्या वेगळ्या बातम्या येत आहेत.

मग खा.शरदचंद्र पवार हे पक्षासमोर मुलाखती देणाऱ्या निष्ठावंतापैकीच कोणा एकाला तिकीट देणार की मागे फंद फितूरी करून दगाबाजी करणारांनाच पायघड्या घालणार असा प्रश्न माजलगाव मतदार संघातील जनतेला पडला आहे.

## आदमी बेईमान हो जाएगा, मगर मेरी बहन बेईमान नही होगी, शिंदे गटातील नेत्याने व्यक्त केला विश्वास

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक तोंडावर येऊन ठेपली आहे. त्यातच राज्य सरकारने महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेद्वारे महिलांना दर महिना १५०० रुपये दिले जात आहे. आता या लाडकी बहिण योजनेवरुन शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री गुलाबराव पाटील यांनी एक वक्तव्य केले आहे.



“कोणी कितीही लालसा देऊ द्या, एकवेळ पुरुष बेईमान होतील. पण माझ्या बहिणी कधीच बेईमान होणार नाहीत”, असे विधान गुलाबराव पाटील यांनी केले. ते जळगावात बोलत होते.आगामी विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने गुलाबराव पाटील यांची जळगावात सभा पार पडली. या सभेत गुलाबराव पाटील यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला. तसेच यावेळी गुलाबराव पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कौतुकही केले. “जर पुन्हा आमचं सरकार आलं, तर लाडकी बहीण योजनेचे पैसे दीड हजारांवरुन ती न हजार करु, अशी शपथ मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतली आहे”, असे गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

“महिलांकडे जास्तीत जास्त लक्ष देण्याचा प्रयत्न” “आमचे मुख्यमंत्री महिलांसाठी खूप प्रयत्न करत आहेत. आता मुलगी जन्माला आली की कंटाळा करायचं काम नाही असं काम मुख्यमंत्र्यांनी केले आहे. योगायोगाने सर्व दाढीवाले वरती बसले आहे. नरेंद्र मोदी दाढीवाले, एकनाथ शिंदे दाढीवाले आणि गुलाबराव पाटील सुद्धा दाढीवाला. एखादा निर्णय घेत असताना महिलांकडे जास्तीत जास्त लक्ष देण्याचा प्रयत्न या सरकारने केलेला आहे”, असे गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
रविवार ६ सप्टेंबर २०२४




# आ.आजबेच्या नेतृत्वाखाली मतदार संघाची शासवत विकासाकडे वाटचाल.

## आज पाटोद्यात २४६ कोटी ७७ लाखाच्या विकास कामाचे भूमिपूजन!



### हाच तर आहे आमदार बाळासाहेब आजबे काकांच्या संकल्पनेतील विकास!

### आष्टी मतदारसंघाला विकासाचे तोरण हे आजबेंचे धोरण

**पाटोदा | प्रतिनिधी**

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाच्या विकासाची धुरा आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी हाती घेतल्यापासून सिंचनापासून दळणवळणापर्यंत सर्वच गोष्टी झपाट्याने विकासाच्या दिशेने धावत आहेत. आष्टी तालुक्यातील महत्वकांक्षी कुंटेफळ साठवण तलावाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी केलेले प्रयत्न आणि पाटोदा व शिरूर तालुक्यात दळणवळण आणि शासकीय इमारतीसाठी खेचून आणलेला निधी हा अतुलनीय आहे. यामुळेच आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील जनतेने आमदार करण्यासाठी केला होता हट्टास. जनतेच्या त्याच हाताला आमदार बाळासाहेब आजबेंनी सुद्धा पूर्णत्वाकडे घेऊन गेले आहेत. जनतेच्या मनातील विकास त्यांनी साक्षात उतरवला आहे. आज पाटोदा तालुक्यातील दुय्यम निबंध कार्यालय बांधकामासाठी 2 कोटी 12 लाख रुपये, प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यासाठी 23 कोटी 94 लाख रुपयांची मंजुरी मिळून कामाचे भूमिपूजन आज होत आहे, त्याचबरोबर महसूल अधिकारी व कर्मचारी निवास स्थान इमारत बांधकाम करण्यासाठी 14 कोटी 38 लाख रुपयाचे भव्य भूमिपूजन आज होत आहे. तसेच हिवरसिंगा र.मा.59 पासून वडझरी, डोंगरी, रोहतवाडी रा.मा.55 वर थेरला, सावरगाव, सोनेगाव, दासखेड, पाचंग्री प्राजिमा 1 की.मी. 0/00 ते 41/00 मध्ये रुंदीकरणासाठी सुधारणा करणे हाय ब्रीड ऑन्यूड्युटी अंतर्गत 206 कोटी 33 लक्ष रुपयाच्या रस्ता कामाचा भव्य शुभारंभ देखील रविवार दिनांक 6 ऑगस्ट 2024 रोजी दासखेड येथे होणार आहे. या भूमिपूजन समारंभासाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे सरचिटणीस अमरसिंह पंडित, लोकप्रिय आमदार बाळासाहेब आजबे, मोहोळ विधानसभा सदस्य यशवंत माने, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भूमिपूजन समारंभ कार्यक्रम रविवार दिनांक सहा रोजी सकाळी 10:30 ला दासखेड येथे तर 11:45 ला विठ्ठल रुक्मिणी संस्थान पाटोदा या ठिकाणी तर होणार आहे, तरी आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, माता भगिनींनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आव्हान राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी पाटोदा तालुक्याच्या वतीने करण्यात आले आहे.

### जनतेच्या सेवेत कायम - आ. आजबे

माझ्या आमदारकीचा कार्यकाळ हा जनतेच्या सेवेसाठी वाहिला असून येणाऱ्या काळात देखील जनतेसाठी काम करत राहील. आमदारकीचा उपयोग एनसीवीसाठीच असेल आणि तो केला आहे आणि यापुढे देखील करत राहील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठीच माझी आमदारकी आहे आणि तेच आज पर्यंत केले आहे आणि करत राहणार आहे. रिव्हॉल्वर बघत असताना गोळी सुटली आणि गुडघ्यात शिरली. अरे गोळी गुडघ्यात कशी शिरली. बरं तू अभिनेता आहे, तू म्हणतोय ते खरं. त्यावर काही बोलताही येत नाही. कारण खासदार होते. खासदारांवर विश्वास ठेवला पाहिजे. पण पुन्हा म्हणाल. दादांनी चिमटा काढला. मी बोलायच्या ओघात बोलत आहे", असं अजित पवार म्हणाले.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com